# Activities in the Department







कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव




Shri Shivaji Vidya Prasarak Sanstha's
Late S. D. Pat lias Baburao Dada Arts, Commerce and Late M. D. Sisode Science
College Shindkheda, Dist.- Dhule.
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जन्मशताब्दी
लेखन कार्यशाळा
Shri Shivaji Vidya Prasarak Sanstha's
Late S.D.Patil alias Baburao Dada Arts,
Commerce and Late Bhausaheb
M.D.Sisode Science College,
Shindkheda,Dist.-Dhule
श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे
कै.शं.दे.पाटील उर्फ बाबुराव दादा साहित्य, वाणिज
आणि कै.म.दि.सिसोदे विज्ञान महाविद्यालय,
शिंदखेडा, जि. धुळे - ४२५४०६



लोकमत

मराठी राजभाषा दिवस उत्साहात

# मराठी भाषेचे संवर्धन करणे, ही काळाची गरज!

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये कवी कुसुमाग्रज वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**कर्म.आ.मा. पाटील महाविद्यालय**

पिंपळनेर- मराठी भाषेचे संवर्धन करणे, ही काळाची गरज आहे. हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध होऊया, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.टी सोनवणे यांनी केले.

पिंपळनेर येथील कर्म. आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी राजभाषा गौरवदिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून चांदवड महाविद्यालयाचे प्रा.डॉ. तुषार चांदवडकर उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. सतीश मस्के यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. संजय खोडके यांनी करून दिला. आभार प्रा.एल.जी. गवळी यांनी मानले.



शिंदखेडा महाविद्यालयात मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

**शिंदखेडा महाविद्यालय**

शिंदखेडा- येथील श्री.शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.तुषार पाटील होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवी प्रा.डॉ. सदाशिव सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.बी.ए. पाटील, डॉ.एस.व्ही. बोरसे, कार्यालयीन अधीक्षक एन.बी. भामरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.एस.टी. राऊळ, प्रा.आर.के. पवार, प्रा.व्ही.एस. पवार, प्रा.डॉ.एस.बी. सावंत, प्रा.डॉ.आशा कांबळे, प्रा.एस.के. जाधव, प्रा.एस.आर. गांगुर्डे, प्रा.वंदना पाटील, प्रा.मुकेश पाटील, प्रा.पंकज चव्हाण, प्रा.जी.बी. बोरसे, प्रा.प्रशांत पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी केले. आभार प्रा.जे.एस. जोशी यांनी मानले.

**पिंपळनेर शाळेत विविध उपक्रम**

पिंपळनेर- येथील विद्यालयात मराठी राजभाषा दिन कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य ए.बी. मराठे, उपप्राचार्या एम.डी. माळी, पर्यवेक्षिका कुलकर्णी, प्रा.जाधव, प्रा.शिंपी यांच्याहस्ते मराठी विश्वकोश व सरस्वतीमाता मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी चारोळी वाचन, सामूहिक काव्यगायन करण्यात आले. प्रा.सी.ए. सोनवणे यांनी मराठी भाषेची महती दर्शक कविता सादर केली. प्रा.बी.एच. बागुल, डी.व्ही. देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिवजयंतीनिमित्त ऑनलाईन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. तसेच मराठी भाषा पंधरवडानिमित्त आयोजित निबंध, म्हणी संकलन, चारोळी, काव्यलेखन, सुविचार संग्रह, घोषवाक्य आदी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



# शिंदखेडा महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**शिंदखेडा–** श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कै. शं. दे. पाटील उर्फ बाबुराव दादा साहित्य वाणिज्य आणि कै. भाऊसाहेब म. दि. सिसोदे विज्ञान महाविद्यालय शिंदखेडा येथे मराठी राजभाषा दिनानिमित्त प्रा. डॉ. फुला बागुल यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार एम. पाटील यांच्या हस्ते कवी विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. सदर कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. एस. व्ही. बोरसे उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. पवार प्रा. आर. के. पवार आदी उपस्थित होते. डॉ. फुला बागुल यांनी आपल्या व्याख्यानातून आजच्या वर्तमान काळातील मराठी भाषेविषयी माहिती देताना अनेक बोलीभाषा मृत्युपंथाला आलेल्या आहेत. बोलीभाषा शिवाय भाषा म्हणजे नाविन्य हरपलेल्या शब्दांचा निरर्थ ढिगारा होय.




उप प्राचार्य डॉ. व्ही. एस. पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

अंदमान मध्ये एक गो भाषा बोलणारी ८० वर्ष वयाची बाई तिच्या जीवनाच्या अखेरच्या काळात केवळ पक्षांबरोबर बोलायची २६ जाने.२०१० ला त्या स्त्रीचा मृत्यू झाला आणि तिच्या मृत्यू बरोबर साठ हजार वर्षांची सातत्याने चालत आलेली एक ज्ञान परंपरा संपली. म्हणून बोलीभाषा जिवंत राहील तरच प्रमाणभाषा टिकेल असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तुषार एम. पाटील यांनी आपल्या मनोगतात भाषा अनुवादाचे स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना व्हायला हवी. त्या अनुषंगाने संस्कृतीचे आदान प्रदान होईल. भाषा संवर्धनासाठी निश्चितच त्याचा फायदा होईल.रशिया चीन जपान जर्मनी फ्रान्स या देशांनी आपल्या मातृभाषेच्या माध्यमातूनच शिक्षण दिले. म्हणूनच या देशांचा विकास उत्तरोत्तर वाढत गेला. आपल्या मातृभाषेचे अस्तित्व आणि अस्मिता ही जपली पाहिजे असे सांगितले.

अहिराणी भाषेतील अनेक शब्द आज नामशेष होत चाललेले आहेत. ही चिंतनाची बाब आहे. तसेच लोकशाहीत जनतेची भाषा हीच शासन व्यवहाराची भाषा असायला हवी. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जे. एस. जोशी आभार प्रा.जयश्री देवरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**साक्री–** तालुक्यातील कळंभीर गावाजवळील गोरक्षनाथ मंदिराजवळ अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी होवून मरण पावला. साक्री पोलीस ठाण्यातील पो. कॉ.मयुर चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.८ फेब्रुवारी रोजी रात्री १२.१७ वाजता चैत्राम बळीराम थोरात (४२) हे त्यांच्या ताब्यातील एम.एच.१८/बी ६७९५ ने कळंबीर शिवारातील शेतामधील घरी जात असताना साक्रीकडून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात चैत्राम थोरात हे गंभीर जखमी होवून मरण पावले. या फिर्यादीवरून साक्री पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकावर प्राणांकित अपघाताची नोंद करण्यात आली आहे. तपास पोहेकॉ. डी.आर. कांबळे करीत आहेत.

लोकमत



अक्कलकुवा येथील वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडाचे उद्घाटन प्रसंगी प्रा.ज्ञानेश्वर सोनवणे, प्राचार्य प्रा.डॉ.सी.पी. सावंत, डॉ.योगेश दुशिंग, मनोज मुधोळकर आदी.

# वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**अक्कलकुवा** : वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे २३ जानेवारी रोजी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून शिंदखेडा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.डॉ.सी.पी. सावंत होते.

प्रमुख वक्ते प्रा.डॉ. सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानातून मराठी भाषा संवर्धनाच्या अनुषंगाने बोलताना बोली भाषा जिवंत राहील तरच मराठी प्रमाणभाषा जिवंत राहील. अगोदर बोली भाषेचे संवर्धन आपण केले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

यावेळी प्राचार्य प्रा.डॉ.सी.पी. सावंत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषा संवर्धन कसे गरजेचे आहे, यावर आपले विचार मांडले. या कार्यक्रमास डॉ. योगेश दुशिंग, डॉ. मनोज मधोळकर, डॉ. जबेर शेख, प्रा. राजेश्वरसिंग पाडवी, प्रा. अंकुश खोबरागडे, प्रा. गोपाल शेंडे, प्रा. विनिश चंद्रण, प्रा. गोटू सूर्यवंशी तसेच कर्मचारी अंकुश ठाकरे, प्रशांत पिंपरे, दिनेश ईशी, भरत साळवे, नारायण पाटील, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. भरत पाटील, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.विजय पाटील यांनी केले.

Hello Nandurbar
Page No. 2 Jan 24, 2023
Powered by: erelego.com

| Seminar/Webinar/Guest lectures organised | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Resource Person | Seminar/Webinar/Guest lectures | Institution | Topic | Date |
| 01 | | | | | |

Content Developed

| Books/ Manual | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name/s of author/ editor | Title | Publisher | Year: ISBN | Type (reference/ Text book /proc./ebook) |
| 01 | | | | | |
| 02 | | | | | |
| 03 | | | | | |

## Events and Gallery:

# . Gallery:






